जिल्हा परिषद,नागपूर
आरोग्य विभाग

**निविदा सुचना**

**(कंत्राटी वाहन चालकांची सेवा पुरविण्यासाठी)**

**ई-निविदा सुचना क्रमांक / १ /२०१९-२०२०** **दिनांक :- ५ /११ /१९**

जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत नागपूर जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वाहन सेवेसाठी २५ कंत्राटी वाहन चालक आवश्यकता आहे. त्यासाठी वाहन चालकांची सेवा पुरविण्याकरिता सुशिक्षित बेरोजगाराच्या नोंदणीकृत संस्थाकडून ई-निविदा (दोन लिफापा) पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदेतील अटी व शर्ती तसेच निविदा फार्मचा नमुना व संपूर्ण माहिती शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून निविदा सादर करण्याच्या कालावधी खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाची निविदा प्रपत्र संकेत स्थळावर भरण्याचे कालावधी (टेंडर अपलोड) | दिनांक ०६/११/२०१९ पासून ते दिनांक१९/११/२०१९ दुपारी ६.०० वाजे पर्यत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/११/२०१९ दुपारी ३.०० वाजता |
| निविदा प्रपत्र बाबतचे लिफापा क्र.१ सादर करण्याचा दिनांक (स्कॅन करुन अपलोड केलेले कागदपत्र) | दिनांक १९/११/२०१९ ला आरोग्य विभाग जि.प.नागपूर येथे दुपारी ६.०० वाजेपर्यत |

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,नागपूर

# जिल्हा परिषद नागपूर

## ई-निवीदा सूचना

## (कंत्राटी वाहन चालकांची सेवा पुरविण्यासाठी)

**ई-निविदा सूचना क्रमांक १ /२०१९-२०२०** **दिनांक :-**

जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत, नागपूर जिल्ह्यात स्थापीत ४९ प्राथमिक आरोग्य केन्द्रातील व ३ फिरते आरोग्य पथकातील रिक्त असलेल्या २८ वाहन चालकांचे पदांचे ठिकाणी २८ कंत्राटी वाहन चालकांची आवश्यकता आहे (कंत्राटी वाहन चालकांचे संख्येत आवश्यकतेनूसार वाढ अथवा घट होवू शकते). कंत्राटाचा कालावधी करारनामा झाल्यापासून अकरा महिण्यासाठी राहील.

त्यासाठी ई-निविदा सूचना क्रमांक/१/२०१९-२०२० जिल्हा परिषद नागपूरच्या वेब साईटवर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत वित्तीय वर्ष २०१७-१८ साठी वाहन चालकांची सेवा पूरविण्याकरिता इच्छुक सुशिक्षित बेरोजगारांच्या नोंदणीकृत संस्थाकडून ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा स्वरुप व व्याप्ती बाबत प्रपत्र-ब मध्ये सविस्तर माहिती उपलब्ध आहे. आणि कामाची किंमत, निविदा विक्रीचा दिनांक व निविदा स्विकृतीचा दिनांक व निविदा उघडण्याचा दिनांक इत्यादी बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

## कंत्राटी वाहन चालकांची सेवा निविदेच्या अटि व शर्ती

१. वाहन चालकांच्या संस्था जिल्हा रोजगार व स्वरायंरोजगार केंद्र कडे नोंदणीकृत संस्था बेरोजगारांची स्थापन केलेली सहकारी सेवा संस्था यांना प्राधान्य देण्यात येईल. बेरोजगारांची स्थापन केलेली सहकारी सेवा संस्था यांची स्थापना ही ऑगष्ट २००० नंतर केलेली असावी. तसेच सहकार कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत असावी.

२. बेरोजगारांची सहकारी सेवा संस्था त्यांना देण्यात येणारे काम करण्यासाठी पात्र असावे

१. आवश्यक असणाऱ्या वाहन चालकांना शासनाच्या धोरणानुसार घालून दिलेल्या मर्यादेच्या ७५ ते ९० टक्के पेक्षा जास्त (नियमित सेवेत नवनियुक्त वाहन चालक देय मुळ वेतनपेक्षा जास्त) मोबदला दरमहा देता येणार नाही.

२. कोणतेही कारण न दाखविता (दर्शविता) निवीदा रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहे.

३. निविदा फार्म दि.१९/११/१९.ला .६.००.. वाजता. पर्यत Upload करता येईल व Upload केलेल्या ई-निविदेद्वारे सादर अनामत रक्कमेचा Internet Banking दवारे भरणा केल्याची पावती ( Original copy) दि.१९/११/१९.ला .६.००.. वाजता. पर्यत आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपुर या कालावधीत प्राप्त निविदा दि.२०/११/१९ला समिती समक्ष उघडण्यात येईल.

४. निवीदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थाप्रमुखांचे रु.१००/- चे स्टॅम्प पेपर वर अफेडेवीट आवश्यक राहील.

५. निविदा करार निविदा स्विकारल्याचे तारखेपासून अकरा महीण्याच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील व आवश्यकता वाटल्यास पुढे मुदतवाढ देण्यात येईल.

६. ई-निविदा उघडल्यापासुन १८० दिवसापर्यंत विधिग्राहय राहील.

७. पुरवठादार संस्था यांचेकडुन कोणत्याही शर्ती व अटीसह सादर केलेली ई-निविदा स्विकारल्या जाणार नाही.

८. नियमाप्रमाणे लागु असलेल्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

९. ई-निविदा प्रक्रियेसंबंधी योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण नागपूर जिल्हा परिषदेच्या ई-निविदा

विभागात देण्यात येईल व काही तांत्रिक अडचणीसाठी ०७१२- २५६४८४३, या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच dhonagpur2017@gmail.com या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

१०. निवीदा दोन लिफाफा पध्दतीमध्ये स्विकारण्यात येतील. लिफाफा क्र -१ (तांत्रीक लिफाफा), लिफाफा क्रमांक -१ मधील माहीती व त्या संबंधी आवश्यक दस्ताऐवज तपासल्यावर ते आवश्यकतेनुसार योग्य आढळल्यावरच लिफाफा क्रमांक -२ (व्यापारी लिफाफा) उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाचे सर्व कागदपत्र राजपत्रीत अधिकारी/इतर सक्षम अधिकारी यांचे कडुन साक्षांकन केलेले असावेत.

१२. कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची सेवा पुरवीण्यासाठी नागपूर जिल्हा परिषदेत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यासाठी सर्व संस्था यांना सुचित करण्यात येत आहे की, ज्या संस्था सदर निविदा भरण्यास इच्छुक आहेत त्यांना सर्वप्रथम www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पंजीकृत करणे अनिवार्य राहील. तसेच ई-निविदा प्रक्रियेसाठी ई-टोकन (Digital signature) सुध्दा अनिवार्य राहील. त्याकरिता सर्व पुरावठादार संस्था यांना ई-टोकनसाठी लागणारी दस्ताऐवज उदा.(१.पैनकार्ड, २. अॅड्रेसप्रुफ, ३. आय.डी.प्रुफ, नागपूर जिल्हा परिषदेच्या ई-निविदा विभागात जमा करावी लागेल. अन्यथा त्यांना ई-निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. याबाबत नोंद घ्यावी. ई-निविदा प्रक्रिये करिता www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-टोकनसाठी रुपये २२००/- भरल्यानंतर ई-टोकन प्राप्त होईल. कोरी निविदा फार्म दिनांक ५/११/१९ ते दिनांक १९/११/१९ पर्यंतच्या कालावधीत www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्राप्त होईल.

१३. निवीदा सादर करण्याचा कालावधी संपन्याच्या दिवशी विहीत केलेल्या वेळेच्या साधारण: १ तास पुर्वी किमान ३ निवीदा प्राप्त झाल्या नाही तर निवीदा प्रक्रियेस ७ दिवसाची मुदतवाढ देण्यात येईल.

१४. संस्थेने कंत्राटी वाहन चालकांची नियुक्ती करतांना त्यांचे पुर्व चारीत्र्य, व वर्तवनुक याची पडताडणी करुनच नियुक्ती करावी. व त्याबाबत संस्थेने प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१५. पात्र निवीदाराने निविदा किमंतीच्या २टक्के अनामत रक्कम १६ महिन्याचे कालावधी करिता बॅक गॅरंटीचे स्वरुपात जमा करणे आवश्यक राहील.

१८. संस्थेने नेमलेल्या कंत्राटी वाहन चालक यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती देणे बंधनकारक आहे.

१९. प्राथमीक आरोग्य केंद्रांना पुरविलेल्या सेवेच्या मोबदल्यात प्रदान करावयायचे मानधनाचे शोधन करण्याकरिता आवश्यक निधी शासनाकडून प्राप्त होण्यास विलंब झाल्यास कंत्राटी वाहन चालकांना किमान सहा महीण्याचे मानधनाची रक्कम प्रदान करण्याची क्षमता संस्थे कडे असणे आवश्यक आहे.

२०. संस्थेने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने (रेखांकित धनादेशाव्दारेच) अदा करावे.अथवा NEFT/RTGS किंवा Internet Banking द्वारे अदा करावे.

२१. संस्थेने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत, किंवा NEFT/RTGS किंवा internet Banking द्वारे मानधन अदा केल्याचा पुरावा सादर करावे. कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिण्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही

२२. महाराष्ट्र शासन निधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक पदानि२५१२/प्र.क्र.१५७/का.१२ मंत्रालय, मुंबई दिनांक. १९. मार्च २०१४ यात दर्शविण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**लिफाफा क्र.१ मध्ये खालील दस्ताऐवज** Scan **करुन** Upload **करुन सादर करणे अनिवार्य आहे.(प्रत्येक दस्ताऐवज वर दस्ताऐवज कशाचे आहे हे लिहीण्यात यावे).**

१.कोऱ्या निविदेची किंमत रु.३०००/- (नापरतावा) व बयाना रक्कम रु.१,००,०००/- (रु.एक लाख) Internet Banking द्वारे भरणा केल्याची पावती सादर करावीत.

२. संस्थेची नोंदणी प्रमाणपत्रांची सत्यप्रत व वाहन चालकांची सेवा पुरविण्या बाबतचे परवान्याची (निवीदा भरावयाच्य तारखेपर्यंत वैद्य असलेले) प्रत सादर करावीत.

३. प्राथमीक आरोग्य केंद्रांना पुरविलेल्या सेवेच्या मोबदल्यात प्रदान करावयायचे मानधनाचे शोधन करण्याकरिता आवश्यक निधी शासनाकडून प्राप्त होण्यास विलंब झाल्यास वाहन चालकांना किमान सहा महीण्याचे मानधनाची रक्कम प्रदान करण्याची क्षमता संस्थे कडे असणे आवश्यक आहे.त्यामुळे आर्थिक सक्षमतेबाबत १५ लक्ष रु.ची नॅशनल बॅंक सालवंसी सादर करावे.

४. संस्थेची गत तिन वर्षाचे आर्थिक उलाढालीचा दाखला सन २०१६-१७,२०१७-१८,व २०१८-१९चे प्रति वर्ष रु. १.०० कोटी असल्याचा सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र व जंमा खर्च पत्रक सादर करावे.

५. संस्थकडे सेवेत असलेल्या वाहन चालकांचा तपशील (वाहन चालकांचे नाव, वय १८ पेक्षा कमी नसल्या बाबतचा दाखला, किमान ७ वा वर्ग उत्तिर्ण असल्या बाबत दाखला,वाहन चालकाचे वैयक्तीक वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र (गॅजेटेड मेडिकल ऑफीसर) तसेच वाहन चालकाचा वैध वाहनचालकाचा परवाना सादर करावीत.

६. गेल्या ३ वर्षात अशा प्रकारच्या सेवा सुविधा पुरविल्याचा कामाचा अनुभव प्रमाणपत्र व संस्थेकडे किमान २५ वाहन चालक पुरविल्याचा अनुभव असल्याचा दाखले सादर करावे.

७. सदरची मनुष्यबळ पुरवठा करणारी संस्था शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेली नाही याबाबतचे नोंदनी केलेल्या विभागाकडुन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सादर न केल्यास निविदादारास अपात्र ठरविण्यात येईल.

८. संस्थेकडे भविष्य निर्वाह निधी नोदणी प्रमाणपत्र सादर करावे.

९. संस्थेकडे लेबर चा पुरवठा करण्याकरीता नोदणी प्रमाणपत्र किंवा ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे..

१०. ई.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

११ व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र व लगतचे ३ वर्षाचे क्लीयरेंस प्रमाणपत्र सादर करावे.

१२. संस्थेने पॅनकार्डाची सत्यप्रत सादर करावे.

१३. लगतचे ३ वर्षाचे आयकर चे प्रमाणपत्र सादर करावे.

१४. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व जिएसटी भरल्याचे Clearance Certificate सादर करावे.

**लिफाफा क्रमांक-२ (व्यापारी लिफाफा)**

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयाकडून www.mahatenders.gov.in / www.nagpurzp.com या संकेत स्थळावर on line उपलब्ध असलेल्या Excell sheet मध्ये प्रती महिना प्रती वाहन चालक मानधन (रुपये) दर नमुद करण्यात यावे. (वाहन चालकांची सेवा पुरविण्यासाठी भरलेले दर वाहन चालकांचे सूरक्षा विमाची रक्कम व त्यांना देय सर्व प्रकारचे भत्त्यांची रक्कमेसह असावेत.

सदर निवीदा दिनांक .२०/११/२०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे दालनात दुपारी.३.०० वाजता उघडण्यात येतील. याबाबतचे अधिकचे विवरण जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्राप्त होऊ शकेल.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपुर

स्वा/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नागपुर

## प्राथमिक आरोग्य केन्द्रातील वाहन चालकांच्या सेवेची व्याप्ती व स्वरुप

१) प्राथमिक आरोग्य केन्द्राकरिता वाहन चालकांची सेवा २४ तास द्यावी लागेल.
२) वाहन चालक हे वैद्यकियदृष्टया पात्र असावेत.
३) वाहन चालक हा कंत्राटदारामार्फत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या वाहन चालकांची वैद्यकिय तपासणी वैद्यकिय अधिकारी करतील कामावर असतांना वाहन चालकांना गणवेष परिधान करणे व गणवेषाला ओळखपत्र लावणे अनिवार्य राहील.
४) निवड करण्यात आलेल्या वाहन चालकांना जिल्हा आरोग्य अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या परवाणगीशिवाय बदलविण्यात येऊ नये.
५) संस्थेने वाहन चालकांचे सुरक्षा विमा (इन्शुरन्स) काढणे किंवा वाहन चालकांचे इंन्शूरन्स असणे आवश्यक आहे.

**खाली नमुद बाबी पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील**

१) वाहन चालकांना गणवेष

**कार्यालयाकडून ठेकेदारांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा**

१) कंत्राटी कामगारांना ओळखपत्र

**वाहन चालक सेवेचे संनियंत्रण :-**

खालील सदस्यांची समिती वाहन चालकांना सेवेची गुणवत्ता पडताळणी दरमहा करेल.जिल्हा आरोग्य अधिकारी/प्रा.आ.केन्द्राचे प्रमुख वैद्यकिय अधिकारी व ठेकेदाराचे प्रतिनीधी.

संस्थेच्या/कंत्राटी कर्मचाऱ्याच्या असमाधानकारक सेवेबाबत समज देण्यात येईल व कामात सुधारणा न दिसून आल्यास दंड आकारण्यात येईल. कंत्रादाराच्या सेवा मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने न आढल्यास त्या कुठल्याही क्षणी रद्द करण्याची शिफारस प्राथमिक आरोग्य केन्द्र प्रमुख, जिल्हा व्यवस्थापन समिती तथा जिल्हा आरोग्य अधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे करतील. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम जप्त करण्यात येईल.
निवीदा धारकांनी वरील सर्व अटी आणि शर्तीच्या अधिन राहून नमूद केलेल्या प्रमाणकानुसार दर नमुद करावेत.
निवीदा मंजुर झाल्यानंतर करारनामा वेगळा भरावा लागेल तसेच करारासोबत ३ टक्के रकमेचे एक वर्ष कालावधीचे बँकेचे हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर अनामत रकमेचा डाफ्ट परत करण्यात येईल. प्राप्त झालेल्या निवीदांपैकी कोणतीही निवीदा काही कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | स्वा/- **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिषद नागपूर** | **जिल्हा परिषद नागपूर** |